सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८० | गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. प्रकाश शहा
माजी अध्यक्ष : लॉयन्स क्लब, अमळनेर

## दिनविशेष
११ डिसेंबर

- सी.व्ही. रमण यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले.
- कोयना येथे ६.५ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# लाडक्या बहिणींची अडचण दूर होणार
# मदतीला 'ताई' येणार!



## पती, वडील हयात नसलेल्या महिलांनाही मिळणार योजनेचा लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**
**रजनीकांत पाटील**

अमळनेर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत राज्य शासनाकडून वाढविण्यात आली आहे. अनेक महिला पती, वडील किंवा मुलाच्या आधार क्रमांकावरील ओटीपी उपलब्ध नसल्याने अडचणीत सापडल्या होत्या. मात्र त्यांना आता आवश्यक कागदपत्रांची सत्यप्रत अंगणवाडी सेविकेकडे जमा करून ई-केवायसी करता येणार आहे. त्यामुळे अशा महिलांनाही या योजनेचा आता नियमितपणे लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी महिलांनी ladakibahin.maharashtra.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. लॉगिन करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी येथे क्लिक करा, या पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतर नवीन वेबपेज ओपन होईल. ई-केवायसी पेजवर लाभार्थी आधार क्रमांक नोंदवावा लागेल. त्यानंतर कॅप्चा कोड नोंदवावा, तो नोंदविताना चूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी. कॅप्चा कोड नोंदविल्यानंतर आधार प्रमाणीकरणासाठी संमती द्या. आधार प्रमाणीकरण संमतीमधील मजकूर वाचून सहमत आहे, या पर्यायावर क्लिक करावे. यानंतर ओटीपी पाठवा, हा पर्याय निवडा, यानंतर आधार लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी मिळेल. त्यानंतरच नोंदणी कन्फर्म होते.

**'या' कागदपत्रांवरून करता येणार ई-केवायसी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या पोर्टलवर ई-केवायसीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात दोन महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सदर कालावधीत ज्या लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण केले नाही ते पुढील हप्त्यासाठी पात्र राहतील, असे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. ई-केवायसी करण्यासाठी आधार कार्ड व त्यासोबत जोडलेला मोबाईल क्रमांक सोबत ठेवणे आवश्यक आहे.

> 
>
> जवळपास सर्वच पात्र महिलांनी आपली ई-केवायसी केली आहे. काही मोजक्या महिला ई-केवायसी करण्याचे बाकी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ई-केवायसीसाठी अंगणवाडी सेविका यांचे गेल्या १५ दिवसांपासून पासून कामकाज सुरू आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींची अडचण दूर होणार आहे
>
> **– प्रेमलता पाटील**
> महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी, अमळनेर.

### अंगणवाडी सेविकेकडे कागदपत्रे द्यावी लागणार

१) शासनाने पती आणि वडील हे दोघेही नसलेल्या किंवा हे दोघेही मृत असलेल्या महिलांसाठी विशेष सुविधा सुरू केली आहे.
२) अशा महिलांनी पती किंवा वडिलांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोटीत असल्यास तसे प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश यांची सत्यप्रत तयार करावी.
३) त्यानंतर या कागदपत्रांची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविकेकडे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत जमा करावी.
४) अंगणवाडी सेविका या कागदपत्रांची तपासणी करून महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे शिफारस करते.
५) त्यानंतर जिल्हा महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी या शिफारशीचे मूल्यांकन करतात आणि शासनाकडे पाठवितात.
६) शासनाच्या अंतिम मंजुरीनंतर संबंधित महिलेला पती किंवा वडिलांची ई-केवायसी न करता योजनेचा नियमित लाभ मिळेल.

### खा. शि. मंडळाची निवडणूक
# पहिल्याच दिवशी २२ अर्जांची विक्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सुपरिचित खान्देश शिक्षण मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक नुकतीच जाहीर झाली. त्यामध्ये ८ संचालक, १ अध्यक्ष, २ उपाध्यक्ष आणि १ विश्वस्त अशी पदे आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार आज बुधवार, १० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्जांची विक्री सुरू झाली. त्यात २२ अर्जांची विक्री झाली.

खा. शि. मंडळाच्या घटनेनुसार कार्यकारी मंडळालाच अधिकार असल्याने ८ संचालकपदांची निवडणूक नेहमीच चुरशीची होत असते. १३ ते १६ डिसेंबर दरम्यान उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. १७ डिसेंबर रोजी अर्जांची छाननी होईल. २० डिसेंबरपर्यंत माघारीची मुदत राहणार असून, याच दिवशी खान्देश शिक्षण मंडळाच्या कार्यालयात उमेदवारांना चिन्हांचे वाटप होईल. ४ जानेवारी रोजी प्रताप महाविद्यालयात मतदान प्रक्रिया पार पडणार असून, ५ जानेवारी २०२६ रोजी शहरातील इंदिरा गांधी भवनात मतमोजणी होणार आहे. दरम्यान पहिल्याच दिवशी २२ अर्जांची विक्री झाल्याने निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### यंदा ५,४९१ मतदार

खान्देश शिक्षण मंडळात यंदा ५,४९१ मतदार आहेत. मागील निवडणुकीत मतदारसंख्या ५,७२१ इतकी होती. त्यातील २३० मतदारांचा मृत्यू झाला असल्याचे पुरावे मिळाल्याने त्यांची नावे वगळण्यात आली आहेत. आणखी काही मतदारांचा मृत्यू झालेला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणूक प्रक्रियेकरिता उपसमितीचे चेअरमन पंडित चौधरी, मनोहर महाजन, सुनील गरुड आणि विवेक भांडारकर काम पाहत आहेत.

# अमळनेर तालुक्यात शालेय गणवेश, बूट अनुदान वितरणात गैरव्यवहार?

## ■ एकाच दुकानातून खरेदीसाठी दबाव;
## ■ तक्रारीनंतर शिक्षणाधिकाऱ्यांकडून चौकशीचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या नियमांनुसार गणवेश व बूट अनुदानाची सर्व अधिकार प्रक्रिया ही व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व मुख्याध्यापक यांच्या अखत्यारीत असते. मात्र अमळनेर तालुक्यात या नियमांना छेद देत गटशिक्षण अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांवर दबाव टाकून सर्व अधिकार स्वतःकडे घेतल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. दरम्यान, यासंदर्भात

तालुक्यातील अंदाजे १६० जिल्हा परिषद शाळा व ६ ते ७ नगरपरिषद उर्दू शाळांना एकाच विशिष्ट दुकानदाराकडूनच गणवेश व बूट घेण्यास भाग पाडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे निर्देशित दुकानदारांकडे बूट विक्रीचे परवाने नसतानाही खरेदी करण्यास सांगण्यात आले. याबाबत अनेक शाळांनी व्यवस्थापन समितीला माहिती न देता निर्णय घेण्यात आल्याचा आरोप मुख्याध्यापकांकडून करण्यात आला आहे.

याच प्रकरणात पहिल्या टप्प्यातील ड्रेस खरेदी जवळपास सर्व शाळांनी एका ठराविक दुकानदाराकडूनच केल्याचे उघड झाले. तर शासनाच्या नियमांची भीती वाटून काही २० ते ४० शाळांनी केवळ दुसऱ्या फर्मकडे निधी वर्ग केला. उर्दू शाळांनादेखील आज बुधवार, दि. १० ऑक्टोबरपर्यंत त्याच व्यापाऱ्याकडून खरेदी करावी अन्यथा निधी वर जाईल, असा दबाव टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी अनेक शाळांच्या फाईल मुद्दाम प्रलंबित ठेवल्या गेल्या, तर १२ नोव्हेंबर २०२५ रोजी उर्दू शाळांचा निधी थेट पहिल्या फर्मकडे वर्ग करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या सर्व बाबींची तक्रार घेत व्यापारी महासंघाचे पुष्पक कोचर यांनी १५ नोव्हेंबर २०२५ रोजी तक्रार नोंदविली होती. त्यानंतर माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती कल्पना चव्हाण यांनी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती स्वाती हवले यांना चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार श्रीमती हवले यांनी अमळनेर येथे येऊन उर्दू शाळांना भेट देऊन अहवाल सादर केला. तथापि, चौकशी सुरू असूनही आजपावेतो विद्यार्थ्यांना गणवेश वाटप झालेले नाही. त्यामुळे पालक व शैक्षणिक संस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

## आमोदे-तासखेडेत शिवमहापुराण कथा
### आज काल्याचे कीर्तन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील आमोदे-तासखेडे येथे ४ ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. आज बुधवार रोजी सकाळी ९ वाजेपासून दुपारी ३ वाजेपर्यंत या कथेंतर्गत दोन्ही गावांतील १०८ भाविकांकडून पितृदोष निवारणानिमित्त होमहवनासह पूजा-अर्चा करण्यात आली. दुपारी ४ ते रात्री ८ वाजेदरम्यान गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. उद्या गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता काल्याचे कीर्तन आयोजित केले आहे. तसेच कीर्तनानंतर परिसरातील १० ते १२ गावांतील भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# प. पू. प्रसाद महाराजांची परतीची वारी अमळनेरमध्ये १५ डिसेंबरला दाखल होणार
## १९ डिसेंबरला चातुर्मास सांगता उत्सवाचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पंढरपूर येथे चातुर्मास पूर्ण करून प. पू. प्रसाद महाराज यांची परतीची वारी सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी अमळनेरमध्ये दाखल होत आहे. दुपारी १२ वाजेपर्यंत शहरातील खाटेश्वर महादेव मंदिर येथे महाराजांचे आगमन होणार आहे. तेथे वारीचे स्वागत करण्यासाठी परिसरातील शिष्य परिवार व भाविकांकडून मोठ्या उत्साहात तयारी करण्यात येत आहे.

मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अंबरिष ऋषी टेकडीवर खिरापत व भजन कार्यक्रम पार पडणार आहे. यात भक्तिगीते, कीर्तन व नामस्मरणाच्या ध्वनीने परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. तसेच मार्गशीर्ष अमावास्या अर्थात शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी चातुर्मास सांगता उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते ११.३० या वेळेत वाडीत देवासमोर भजन कार्यक्रम होईल. त्यानंतर सांगता विधी पार पडणार आहे. भाविकांनी या सर्व कार्यक्रमांवेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे सद्गुरू संतश्री सखाराम महाराज संस्थान, अमळनेरतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

# चांदीच्या दरात मोठी वाढ; ग्राहकांना फुटला घाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुवर्ण बाजारपेठेत आज बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी सकाळी बाजार उघडताच चांदीने मागील उच्चांक मोडीत काढत पुन्हा नवा उच्चांक केला. त्यामुळे ग्राहकांसह व्यावसायिकांत चांगलीच खळबळ उडाली. जळगावातील सुवर्ण बाजारात चांदीच्या दरात तब्बल ८ हजार २४० रुपयांची वाढ झाल्याने दर ३ टक्के जीएसटीसह प्रति किलो १ लाख ९३ हजार ६४० रुपयांपर्यंत महागली.

# अबब! १५ कोटी किंमत, जगात फक्त ३ प्रती




## ३ तास २४ मिनिटांत लिहिले, भारतात याच पुस्तकाची चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पाटणा (बिहार) येथील पुस्तक मेळाव्यात १५ कोटी रुपये किमतीचे 'मैं' चर्चेत आहे. हे भारतातील सर्वांत महागडे पुस्तक पाहण्यासाठी साहित्यप्रेमींची प्रचंड गर्दी होत आहे. रत्नेश्वर सिंह हे बिहारचे लेखक, पत्रकार आणि मोटिव्हेशनल स्पीकर आहेत. ते २० हून अधिक पुस्तकांचे लेखक आहेत. लेखकाने आध्यात्मिक साधनेतून 'ज्ञानाची परम अवस्था' याचा शोध घेतला आहे. ही अवस्था किती मौल्यवान आहे, हे जाणून त्यांनी पुस्तकाची किंमत १५ कोटी ठेवली आहे. 'मैं' या ग्रंथाच्या जगात फक्त ३ प्रती आहेत. मानवच्या ज्ञान प्राप्तीची सर्वोच्च अवस्था म्हणजे काय? ती कशी मिळते? आणि तिचे रहस्य काय? हे या पुस्तकात सांगितले आहे. महायुग त्रयी, रेखना मेरी जान ही ग्लोबल वॉर्मिंगवरील पहिली हिंदी कादंबरी, जीत का जादू, मीडिया लाइव्ह टीव्ही शो 'माना या ना मानो' चे स्क्रिप्ट लेखक, अशी रत्नेश्वर सिंह यांची साहित्यिक कारकीर्द आहे. त्यांना भारत सरकारचा पत्रकारिता विषयक राष्ट्रीय पुरस्कार, विक्रमशीला विद्यापीठाची मानद डॉक्टरेट, पत्रकारिता व अध्यापन क्षेत्रात दीर्घ अनुभव आहे. भारत सरकारच्या भारतेन्दु हरिश्चंद्र पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. पुस्तक मेळाव्यात 'मैं' ग्रंथाचे प्रदर्शन करताना लेखकाने स्वतः या पुस्तकाचा प्रवास सांगितला.

# थंडीत रक्तवाहिन्या आकुंचन पावल्याने वाढतो रक्तदाब!

## आयुर्वेदाचार्य डॉ. लीना चौधरी : पुरेशी झोप घेण्यासह ताण कमी केल्यास नियंत्रण शक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिवाळ्यात हवामान चांगले असते तर रक्तदाब का वाढेल, असे आपल्याला वाटत असल्यास हे पूर्णपणे चुकीचे आहे. हिवाळ्यात रक्तदाब वाढण्याची अनेक कारणे आहेत. सर्वांत मोठे कारण म्हणजे थंडीत शरीरातील रक्तवाहिन्या अरुंद होतात. त्यामुळे रक्तप्रवाह कमी होऊन हृदयावरील दाब वाढून रक्तदाब वाढू शकतो. याशिवाय फ्लू, सर्दी, खोकला यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोकाही थंडीत वाढतो. ज्यामुळे शरीरावर ताण येऊन रक्तदाबावरही परिणाम होण्याची शक्यता असते. त्यावर प्रभावी उपाय म्हणजे या काळात पुरेसे उबदार कपडे घालावेत, नियमित व्यायाम करावा, मीठ कमी खावे, पुरेशी झोप घ्यावी, ताण टाळावा तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने वेळीच औषधे घ्यावीत, असे आवाहन येथील आयुर्वेदाचार्य



डॉ. लीना चौधरी यांनी केले आहे.

डॉ. चौधरी म्हणाल्या, की थंडीच्या दिवसांत लोक कमी प्रमाणात घराबाहेर जातात. त्यामुळे शारीरिक हालचाली कमी होऊन वजन वाढण्यासह रक्तदाब वाढण्याची शक्यता असते. त्याचवेळी हिवाळ्यात जास्त खारट अन्न खाल्ल्यानेही रक्तदाब वाढू शकतो. अशा प्रकारे हिवाळ्यात रक्तदाब वाढण्याची अनेक कारणे आहेत. हिवाळ्यात रक्तदाब वाढण्याची लक्षणे दिसू लागताच तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करणे आवश्यक असते.

### रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी काय कराल?

१) थंडीत सर्वप्रथम तुमचे शरीर उबदार ठेवा. गरम कपड्यांशिवाय थंड हवेत बाहेर जाणे टाळा. रक्ताभिसरण योग्य राहण्यासाठी दररोज चालणे, योगा किंवा स्ट्रेचिंग यासारख्या हलक्या शारीरिक हालचाली करा.
२) तापमानातील चढउतार, पुन्हा उसळलेली थंडीची लाट यामुळे उच्च रक्तदाबाचे रुग्ण झपाट्याने वाढतात. थंडीत ही समस्या अधिक गंभीर बनते. हिवाळ्यात थंडी वाढल्याने तापमान कमी होत असल्याने आपल्या शरीरातील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. नसांच्या आकुंचनामुळे रक्ताभिसरणासाठी जागा कमी होते. परिणामी रक्तदाब नैसर्गिकरीत्या वाढतो. त्यामुळे वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
३) हिवाळ्यात उच्च रक्तदाबाच्या रुग्णांची संख्या वाढते. आजच्या धकाधकीच्या जीवनामुळे अनेकांचे स्वतःच्या आरोग्याकडे अजिबात लक्ष नसते. कामाचा ताण, तसेच इतर अनेक गोष्टींमुळे काही व्यक्ती सतत चिंतेत असतात. एवढेच नव्हे, तर ऋतूमानानुसारही आरोग्यावर परिणाम होत असतात. त्यामुळे वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
४) हिवाळ्यात लोक कमी पाणी

पान ३ वर



# दागिने गहाण ठेवले, कर्ज काढले, व्यवसाय सुरू केला;
# मराठी उद्योजिका करतेय २५ लाखांची वार्षिक कमाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एका महिलेने दागिने गहाण ठेवून आणि कर्ज घेऊन व्यवसायाची सुरूवात केली. आज तीच महिला वर्षाला २५ लाख रुपये कमावते आहे. चला, जाणून घेऊया सुलेवाडीच्या रोहिणी प्रकाश पाटील यांची प्रेरणादायी यशोगाथा.

**शेतीपासून मधमाशी पालनापर्यंत**

सातारा जिल्ह्यातील सुलेवाडी गावच्या रोहिणी प्रकाश पाटील यांनी घर आणि शेतीच्या कामात हातभार लावताना स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. एका वर्तमानपत्रातील जाहिरातीने त्यांच्या आयुष्याला नवे वळण दिले. या जाहिरातीमुळे त्यांना मधमाशी पालनाची प्रेरणा मिळाली. महाबळेश्वर येथे पाच दिवसांच्या विशेष प्रशिक्षणासाठी त्यांनी ३५ महिलांचा गट तयार केला. येथूनच त्यांच्या २५ लाख रुपये वार्षिक उलाढालीपर्यंतच्या अविश्वसनीय प्रवासाला सुरूवात झाली.

**सुरूवातीच्या अडचणी आणि मेहनत**

सुरूवातीला रोहिणी यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. खरेदी केलेल्या पेट्यांमधील मधमाशा उडून गेल्या, आणि पहिल्या टप्प्यात ३५ पेट्यांमधून फक्त ८० किलो मध मिळाले. जे ६०० रुपये प्रतिकिलो दराने विकले गेले. मात्र रोहिणी यांनी हार मानली नाही. प्रशिक्षणात शिकलेल्या पद्धती वापरून त्यांनी बाहेरून मधमाश्या पेट्यांमध्ये वसवल्या आणि आपला व्यवसाय पुढे नेला.

**‘ फॉरेस्ट हनी ’ ब्रँड आणि सेंद्रिय मध**

‘ धर्म लाईफ ’ या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने रोहिणी यांनी पॅकेजिंग आणि ब्रँडिंग शिकले. त्यांनी आपल्या मधाला ‘ फॉरेस्ट हनी ’ हे नाव दिले. हा मध खास आहे. कारण त्यांच्या मधमाशी पेट्या पश्चिम घाटातील कोयना धरणाच्या जंगलात ठेवल्या जातात. जेथे जांभूळ, हिरडा यांसारखी औषधी झाडे आढळतात. यामुळे मधाला सेंद्रिय आणि औषधी गुणधर्म प्राप्त होतात.

**२५ लाखांची वार्षिक कमाई**

रोहिणी यांच्या मेहनतीला यश मिळाले, आणि आज त्यांच्याकडे ११२ मधमाशी पेट्या आहेत, ज्यामधून वर्षाला ८८० ते ९०० किलो मध मिळते. हा सेंद्रिय मध त्या १,२०० रुपये प्रतिकिलो दराने थेट ग्राहकांना विकतात. मागणी इतकी आहे की त्यांना घाऊक किंवा किरकोळ विक्रेत्यांकडे जाण्याची गरज नाही. मध विक्रीसोबतच त्या शेतकऱ्यांना परागीभवन (पॉलिनेशन) सेवांसाठी ७,५०० रुपये प्रति पेटी दराने मधमाशी पेट्या विकूनही कमाई करतात. मध आणि परागीभवन सेवांमधून त्यांची वार्षिक उलाढाल २५ लाख रुपये आहे.


**सक्सेस स्टोरी**





### दागिने गहाण आणि कर्ज घेऊन सुरूवात

एप्रिल २०१४ मध्ये रोहिणी यांनी खादी ग्रामोद्योग प्रशिक्षण संस्थेतून मधमाशी पालनाचे प्रशिक्षण घेतले. गावातील इतर महिलांसोबत त्यांनी मधमाशांची काळजी घेणे आणि मध काढण्याची तंत्रे शिकली. प्रशिक्षणानंतर १५ महिलांनी ५,००० रुपयांची गुंतवणूक करून बचत गट स्थापन केला. मात्र, हा गट लवकरच विघटित झाला. इतर सदस्यांना त्यांची रक्कम परत केल्यानंतर रोहिणी यांनी एकट्याने पुढे जाण्याचा निर्णय घेतला. पैशाअभावी त्यांनी धाडसी पाऊल उचलले. दागिने गहाण ठेवून १.५ लाख रुपयांचे कर्ज घेतले आणि २०१७ मध्ये ३५ मधमाशी पेट्यांसह व्यवसाय सुरू केला.



### प्रशिक्षण आणि भविष्यातील योजना

रोहिणी यांनी आता मास्टर ट्रेनर म्हणूनही काम सुरू केले आहे. त्या सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांसाठी शुल्क घेऊन मधमाशी पालनाचे प्रशिक्षण देतात. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये त्या नैसर्गिक पोळ्यांमधून मधमाश्या पकडून पेट्यांमध्ये वसवतात आणि एप्रिल-मे मध्ये मधाची दोनदा काढणी करतात. मे ते सप्टेंबर या कालावधीत त्या प्रशिक्षण आणि पेट्यांची साफसफाई करतात. पुढील योजनांमध्ये मध आणि सेंद्रिय उत्पादनांसाठी सुपरमार्केट उघडणे, सौर ऊर्जेवर भाज्या सुकवणे आणि सेंद्रिय शेती सुरू करणे यांचा समावेश आहे. रोहिणी प्रकाश पाटील यांची कहाणी ग्रामीण भारतातील महिलांसाठी एक प्रेरणास्रोत आहे. दागिने गहाण ठेवून, कर्ज घेऊन आणि अनेक अडचणींना तोंड देत त्यांनी आपल्या मेहनतीने आणि चिकाटीने यश मिळविले. त्यांचा हा प्रवास दाखवतो, की दृढनिश्चय आणि कठोर परिश्रमाने कोणतीही मंजिल गाठता येते.

# डोनाल्ड ट्रम्प दारू पितात का?



**महासत्तेच्या प्रमुखाबाबत हे माहीत असायलाच हवे**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमेरिकेत दारूचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प दारू पितात का? असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. आज आम्ही तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर सांगणार आहोत.

गेल्या काही काळापासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे चर्चेत आहेत. त्यांनी जगातील जवळपास प्रत्येक देशावर कर लादलेला आहे. त्याचबरोबर ट्रम्प हे आपल्या खाण्याच्या सवयी आणि जीवनशैलीमुळेही नेहमीच चर्चेत असतात. याआधी अनेकदा त्यांचे वैयक्तिक आयुष्य चर्चेत आलेले आहे. अमेरिकेत दारूचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प दारू पितात का? असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. आज आम्ही तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर सांगणार आहोत.

डोनाल्ड ट्रम्प हे दारू पितात का? असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी आयुष्यभर दारू पिणे टाळले आहे. ते कोणत्याही प्रकारचे मद्यपान करत नाही. मोठ्या रॅलींमध्ये, कार्यक्रमांमध्ये किंवा जागतिक नेत्यांसोबतच्या भेटीत ते वाइन किंवा व्हिस्की पीत नाहीत. या ऐवजी ते डाएट कोक पितात. त्यांची ही सवय इतकी प्रसिद्ध आहे की व्हाईट हाऊसमध्ये डाएट कोक मागवण्यासाठी एक लाल बटण देखील लावण्यात आले होते.

**डोनाल्ड ट्रम्प दारूपासून दूर**

डोनाल्ड ट्रम्प यांनी याआधीही जाहीरपणे सांगितलेले आहे की, त्यांनी कधीही दारूचा एक थेंबही पिलेला नाही. अनेकदा गंमत करताना त्यांनी म्हटले, की “ जर मी दारू प्यायलो तर मी जगातील सर्वांत वाईट व्यक्ती असेन. ” ट्रम्प यांच्या जवळच्या लोकांनीही ट्रम्प हे कधीच दारू प्यालेले नाहीत, असे म्हटलेले आहे. दारूऐवजी ते फक्त पाणी आणि डाएट कोक पितात. ट्रम्प हे दारू का पीत नाहीत यामागे एक कहाणी देखील आहे.

**या घटनेने डोनाल्ड ट्रम्प यांची विचारसरणी बदलली**

डोनाल्ड ट्रम्प पाच भावंडांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहेत. त्यांचा मोठा भाऊ फ्रेड ट्रम्प ज्युनियर हा पायलट होता, मात्र दारूच्या व्यसनामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. कारण दारुमुळे ४२ व्या वर्षी हृदयविकाराच्या धक्क्याने त्याचे निधन झाले. फ्रेड नेहमी डोनाल्ड यांना दारू पिऊ नका असे सांगायचा. यामुळे ट्रम्प यांनी आयुष्यभर दारू पिणे टाळले. ट्रम्प यांचे चरित्रकार ग्वेंडा ब्लेअर यांनी म्हटले, की ट्रम्प यांनी त्यांच्या भावाची अवस्था पाहिलेली आहे. त्यामुळे त्यांनी ठरविले आहे की ते कधीही दारूला स्पर्श करणार नाहीत.

# ना कोहली, ना आझम

## पाकिस्तानात गूगलवर सर्वाधिक सर्च केला जातोय ‘हा’ भारतीय क्रिकेटर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

२९ टी-२० सामने, ३७.४८ च्या सरासरीने १०१२ धावा आणि १८९.५१ चा जोरदार स्ट्राईक रेट. ही आकडेवारी ज्या धडाकेबाज फलंदाजाची आहे त्याला २०२५ मध्ये पाकिस्तानात गुगलवर सर्वाधिक सर्च करण्यात आले. तडाखेबंद फलंदाजीने फक्त दीड वर्षातच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वेगळी ओळख निर्माण करणारा हा खेळाडू म्हणजे अभिषेक शर्मा. त्याच्याबद्दल फक्त भारतातच नाही तर पाकिस्तानमधील क्रिकेट चाहत्यांमध्येही प्रचंड उत्सुकता आहे.

बाबर आझम, शाहीन शाह आफ्रिदी आणि हारिस रऊफ यांच्यासारख्या दमदार पाकिस्तानी क्रिकेटपटूंनादेखील टॉप १० मध्ये स्थान मिळाले नाही. पाकिस्तानात सर्वाधिक सर्च करण्यात आलेल्या खेळाडूंमध्ये अभिषेक शर्मानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे क्रिकेटपटू हसन नवाज. त्यानंतर इरफान खान नियाजी, मग साहिबजादा फरहान आणि मोहम्मद अब्बास यांचा नंबर आहे.

अभिषेक शर्माने २०२५ मध्ये अनेक वादळी खेळी केल्या. यावर्षी ऑस्ट्रेलियाच्या विरुद्धच्या ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत त्याने ४०.७५ च्या सरासरीने १६३ धावा केल्या होत्या. त्याने १६१ च्या स्ट्राईक रेटने धावा फटकावल्या होत्या. भारताने ही मालिका २-१ ने जिंकली होती. याच वर्षी आशिया कपमध्ये पाकिस्तानच्या विरोधात फक्त ३९ चेंडूंमध्ये त्याने ७४ धावा फटकावत भारताला विजय मिळवून दिला होता. त्यावेळेस टी-२० क्रिकेटमधील उदयोन्मुख तारा म्हणून त्याच्या नावाची चर्चा सुरू झाली होती.

भारताने फलंदाजीला सुरूवात करताच पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रऊफची भारताच्या सलामीवीरांबरोबर जोरदार वादावादी झाली होती. रऊफ आणि अभिषेक शर्मा यांच्यात बाचाबाची झाली होती. त्यानंतर पंचाला हस्तक्षेप करावा लागला होता. सलामीला येत अभिषेक शर्माने भारतीय डावाची सुरूवात षटकाराने केली होती. त्यानंतर त्याने तडाखेबंद फलंदाजी करत ३९ चेंडूंमध्ये ७४ धावा केल्या होत्या. या खेळीत त्याने ६ चौकार आणि ५ षटकार लगावले होते.

सामन्यानंतर अभिषेक शर्मा म्हणाला होता, की “ ज्याप्रकारे विनाकारण ते (पाकिस्तानी खेळाडू) आमच्याकडे येत होते, ते मला अजिबात आवडले नाही. त्याच कारणामुळे मी अशी तुफानी फलंदाजी केली. ”

**युवराज आणि सेहवाग यांच्या शैलीचा प्रभाव**

क्रिकेटच्या जाणकारांना अभिषेकमध्ये वीरेंद्र सेहवागचा आक्रमकपणा आणि युवराज सिंहची आकर्षक शैली दिसते आहे. अभिषेक शर्मावर देखील युवराज सिंहचा मोठा प्रभाव आहे. रणजी ट्रॉफीमुळे दोघांची भेट झाली. पंजाब क्रिकेट असोसिएशनला वाटत होतं की अभिषेक आणि शुभमन यांना रणजीमध्ये संधी देण्यात यावी. त्यावेळेस युवराज सिंह त्याच्या आजारपणातून सावरून पुन्हा भारतीय संघात पुनरागमन करण्यासाठी प्रयत्न करत होता आणि बीसीसीआयच्या सूचनेनुसार रणजी खेळू लागला होता. युवराज सिंहला सांगण्यात आले, की अंडर १९ मधून दोन खेळाडू येत आहेत. त्याला सांगण्यात आले की एक सलामीवीर फलंदाज आहे आणि दुसरा डावखुरा फिरकी गोलंदाज आहे.



राज कुमार शर्मा म्हणाले, की “ युवराज म्हणाला, मला फलंदाज हवा आहे, कारण माझ्याकडे गोलंदाज आहे. निवड समितीचे सदस्य म्हणाले की नाही, दोघांना संधी दिली पाहिजे. एका सामन्यात तीन-चार खेळाडू लवकर बाद झाले. ” “युवराज फलंदाजी करत होता. तो म्हणाला, की अभिषेकला फलंदाजीला पाठवा. मग तो आला आणि युवराज पाहतच राहिला. युवराज ४० धावांवर खेळत होता. अभिषेक आला आणि त्यांना तडाखेबंद १०० धावा केल्या. ”

शर्मा म्हणाले, की युवराज सिंह मैदानावरच म्हणाला होता की अभिषेक शर्मा त्याच्याकडे प्रशिक्षण घेईल का, यावर अभिषेकने उत्तर दिले होते की तो युवराजला त्याचा आदर्श, त्याचा देव मानतो. युवराजला पाहूनच तो खेळण्यास शिकला आहे. तेव्हापासून आजपर्यंत तोच अभिषेकला प्रशिक्षण देतो आहे. दोघांचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेले आहेत. अशाच एका व्हिडिओमध्ये युवराज सिंह अभिषेक शर्माला म्हणतो, की ‘ तू ना सुधरी, बस छक्के मारी जाईं, थल्ले ना खेलीं.’ म्हणजेच तू फक्त षटकारच ठोकत राहा. जमिनीवरचे शॉटदेखील खेळत जा.

अभिषेकचे वडील म्हणतात, की “युवराज सिंहच त्याला प्रशिक्षण देतो आहे. तो माझ्या मुलाची पूर्ण काळजी घेतो. त्यानं माझ्या मुलाला मानसिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या कणखर बनवलं आहे. त्यानं त्याची पूर्ण टीम अभिषेकसाठी नियुक्त केली आहे, जेणेकरून एक दिवसदेखील वाया जाता कामा नये.”

“जर जागतिक दर्जाचा अष्टपैलू खेळाडू प्रशिक्षण देत असेल, तर विचार करा की तो खेळाडू कुठपर्यंत मजल मारू शकतो. ही तर फक्त सुरूवात आहे!”

### वडील झाले होते भावनिक

आशिया कपमध्ये जोरदार कामगिरी केल्यानंतर अभिषेक शर्मा याचे वडील राज कुमार शर्मा यांच्याशी एका माध्यम प्रतिनिधीने संवाद साधला होता. त्यावेळेस राज कुमार शर्मा म्हणाले होते, की “ मी प्रथम श्रेणी क्रिकेट खेळलो आहे. मी माझ्या आईला सांगायचो की माझे सर्व सहकारी भारतासाठी खेळले, मात्र मी खेळू शकलो नाही. का खेळू शकलो, हे माहीत नाही. कदाचित देवाची तशीच इच्छा होती. ”

“ तेव्हा माझी आई म्हणायची की काही हरकत नाही. तू खेळू शकला नाहीस, तरी तुझा मुलगा भारतासाठी नक्की खेळेल.” त्या दिवसांची आठवण काढताना राज कुमार शर्मा भावनिक होतात. ते पुढे म्हणाले, की “ हा माझ्यासाठी खूप चांगला काळ आहे. माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते, की मुलगा असो की मुलगी, त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे. ज्या क्षेत्रात ते जातीत तेथे त्यांनी चांगली कामगिरी करावी. ”

> **माझ्या मुलाने अनेक वर्षांपूर्वी बॅट हाती घेतली होती. त्याने संघर्ष केला, खूप मेहनत केली. आज तो फक्त भारतासाठीच खेळत नाहिये, तर सामनादेखील जिंकून देतो आहे. हे पाहून मला अतिशय आनंद होतो आहे.**

# भारतीय लोक असभ्य स्वार्थावर आधारित संस्कृतीचे अनुयायी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भ्रष्टाचारमुक्त देशांच्या यादीत वरच्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडमधील एक लेखक ब्रायन यांनी भारतात अत्यंत व्यापक प्रमाणात पसरलेल्या भ्रष्टाचाराविषयी एक लेख लिहिला आहे. हा लेख सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. लेखाची लोकप्रियता आणि प्रभाव पाहून काहींनी त्याचे मराठी भाषांतर आहे.

**भारतीय लोक होब्सच्या** विचारसरणीसारखे म्हणजेच अनियंत्रित, असभ्य स्वार्थावर आधारित संस्कृतीचे अनुयायी असल्यासारखे दिसतात. भारतात भ्रष्टाचाराचा एक संस्कृतिक घटक आहे. भारतीय भ्रष्टाचारात कुठलाही गैरभाव मानत नाहीत; उलट तो येथे इतका सामान्य झाला आहे, की त्याबद्दल त्यांना अस्वस्थताही वाटत नाही. भारतीय भ्रष्ट व्यक्तीचा विरोध करण्याऐवजी त्याला स्वीकारतात, सहन करतात. कोणतीही जात किंवा समाज इतका जन्मजात भ्रष्ट असल्याचे सिद्ध होत नाही. भारतीय इतक्या सुलभतेने भ्रष्ट का होतात, हे समजून घ्यायचे असेल तर त्यांच्या जीवनपद्धती आणि परंपरा पाहाव्या लागतील.

**संपन्न भारतीय संस्कृती भ्रष्टाचाराला इतक्या सहजतेने आत्मसात का करते?**

१) कारण त्यांना त्यात नैतिक कलंक वाटत नाही. भ्रष्टाचारात दोष नाही, अशी त्यांची सांस्कृतिक धारणा आहे.
इतकी की अत्यंत भ्रष्ट समजली जाणारी. नेतेही उदा. जयललिता पुन्हा सत्तेत येतात. पाश्चात्य देशांत हे अशक्य आहे.

२) भारतीयांचा भ्रष्टाचाराबाबतचा संशयी आणि स्वाभाविक दृष्टिकोन इतिहासातही दिसतो. भारतीय इतिहास सांगतो, की अनेक शहरे, किल्ले आणि राज्ये लाच देऊन किंवा गेट उघडून जिंकली गेली. हे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत भारतात अत्यंत जास्त आहे. भारतीय उपखंडात मोठी युद्धे तुलनेने अत्यल्प झाली. हे आश्चर्यकारक आहे की भारतीयांनी प्राचीन ग्रीस, रोम किंवा आधुनिक युरोपपेक्षा खूपच कमी युद्धे लढली. आक्रमणकर्त्यांना युद्धाची गरज नव्हती. योग्य व्यक्तीस लाच दिली तर संपूर्ण सेना बाजूला व्हायची. प्लासीच्या युद्धातही भारतीय सैन्याने प्रतिकार केला नाही. क्लाइव्हने मीर जाफरला पैसा दिला आणि बंगालची भव्य सेना ३००० सैनिकांवर आली. गोलकुंडा १६८७ मध्ये मागील गुप्त दरवाजा उघडवून घेत जिंकला गेला. मराठे राजपूतही अनेकदा पैशाने शांत केले गेले. श्रीनगरच्या राजाने दाराच्या मुलाला सुलेमानला पैशाच्या बदल्यात औरंगजेबाकडे दिले. भारतात मोठ्या प्रमाणावर पैशासाठी विश्वासघात झाल्याची उदाहरणे असंख्य आहेत.

३) भारतीय ‘ सर्वांनी नैतिक वागल्यास सर्वांची प्रगती होते ’ या तत्त्वावर विश्वास ठेवत नाहीत. त्यांचा धर्म किंवा विश्वास हे शिकवत नाही. जातिप्रथा त्यांना विभागते. ‘ सर्व मानव समान आहेत ’ यावर ते सहज विश्वास ठेवत नाहीत. या विभाजनामुळे समाजाचे अनेक तुकडे झाले. काहींनी शीख, जैन, बौद्ध असे धर्म स्वीकारले; काहींनी ख्रिश्चन व इस्लाम स्वीकारला. परिणामी भारतीय एकमेकांवर विश्वास ठेवत नाहीत. भारतामध्ये ‘ भारतीय ’ अशी एकसंध ओळख नाही; ते हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन इत्यादी अशा गटांत विभागलेले आहेत. भारतीय विसरले आहेत, की १४०० वर्षांपूर्वी ते जवळजवळ सर्व एकाच धर्मात होते. या विभागणीतून एक रुग्ण संस्कृती तयार झाली. ही असमानता शेवटी समाजाला भ्रष्टतेकडे घेऊन गेली. अशा समाजात प्रत्येक भारतीय दुसऱ्या भारतीयाविरुद्ध उभा आहे, फक्त देवाविरुद्ध नाही.

– लेखक : ब्रायन (न्यूझीलंड)

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# एकल महिलांशी विवाह करण्यास आठ हजार पुरुष तयार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने येत्या रविवारी (१४ डिसेंबर) एकल महिलांच्या पुनर्विवाहासाठी सर्व जातीय, मोफत वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. परंतु जिल्हा परिषदेने केलेल्या एकल महिलांच्या सर्वेक्षणातून जिल्ह्यात तब्बल ९४ हजारांहून अधिक एकल महिला असल्याचे समोर आले आहे. या एकल महिलांशी विवाह करण्याची तयारी ८ हजार पुरुषांनी दर्शविली आहे. त्यामुळे नियोजित मेळावा हा पुढे ढकलण्यात आला आहे. टप्याटप्याने हा मेळावा आता ऑनलाईन घेतला जाईल, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी दिली.

मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाभरात सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात नाशिक जिल्ह्यात तब्बल ९४ हजार ९८५ महिला एकल असल्याचे आढळून आले. या एकल महिलांशी विवाह करण्यासाठी ८ हजार पुरुषांनी तयारी दर्शविल्याची बाब समोर आली आहे. त्या तुलनेत दुसरीकडे एकल महिलांची संख्या मात्र अत्यल्प आहे. जिल्हा परिषदेच्या नव चेतना अभियानाच्या माध्यमातून एकल महिलांच्या सामाजिक, मानसिक व आर्थिक पुनर्वसनाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला असला तरी त्यातून भीषण वास्तव समोर आले आहे. पुनर्विवाहासाठी इच्छुक असलेल्या एकल महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पुरुषांनी नोंदणी केली. पण, महिलांचा अजूनही फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

**पंच्याण्णव हजार एकल महिला**

नाशिक जिल्हा परिषदेने घेतलेल्या पुढाकाराने जिल्ह्यातील एकल महिलांचे पहिल्यांदाच व्यापक सर्वेक्षण करण्यात आले असून, त्यात तब्बल ९४ हजार ९८५ एकल महिला आढळून आल्या आहेत. हे सर्वेक्षण अद्याप पूर्ण झालेले नसल्याने ही संख्या लाखांवर जाण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. सर्वेक्षणात आढळलेल्या एकल महिलांमध्ये सर्वाधिक म्हणजे ८९,३७४ विधवा आहेत. त्याखालोखाल २,९५८ परित्यक्ता, १,९९५ घटस्फोटित आणि ६५८ अविवाहित प्रौढ महिला (कुमारिका) आहेत. सिन्नर, इगतपुरी, निफाड आणि येवला या तालुक्यांमध्ये एकल महिलांची संख्या सर्वाधिक आहे. यापैकी ५५ वर्षांखालील सुमारे ३६ हजार महिलांसाठी रोजगार निर्मितीवर विशेष भर देण्यात येणार असून, ज्येष्ठ एकल महिलांसाठी आरोग्य, मानसिक आधार आणि सुरक्षेचे विशेष कार्यक्रम राबविले जाणार आहेत.

**१३,४३४ अल्पवयीन मुले अवलंबून**

या एकल महिलावर १८ वर्षां-खालील १३,४३४ मुले अवलंबून आहेत, त्यात ६,१७१ मुली आहेत. यांना बालसंगोपन योजनेत समाविष्ट करून दरमहा २,२५० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

**अभिनव योजना राबवणार : पवार**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या जाणार आहेत. त्या खालीलप्रमाणे शून्य टक्के व्याजाने कर्ज स्वतःचा व्यवसाय सुरू करणाऱ्या एकल महिलेला ३० हजारांपर्यंतचे कर्ज व्याजमुक्त जिल्हा परिषद व्याज भरेल.

**बचत गटात समावेश**

सध्या बचत गटात नसलेल्या १२,५६५ महिलांना तात्काळ बचत गटात सामील करणार किंवा नवे गट सुरू करणार. सर्व शासकीय कागदपत्रे मिळवून देणार रेशन कार्ड, आयुष्यमान कार्ड, निराधार पेन्शन आदींची पूर्तता ग्रामपंचायतीमार्फत केली जाईल.

**पुनर्विवाहाला प्रोत्साहन**

मुले असलेल्या एकल महिलेचा पुनर्विवाह झाल्यास तिच्या दोन्ही मुलांच्या नावे प्रत्येकी एक लाख रुपये मुदतठेव (१८ वर्षांपर्यंत काढता येणार नाही) जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून जमा केली जाईल.

पान १ वरून

## रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी काय कराल?

पितात. ज्यामुळे डिहायड्रेशन आणि रक्तदाब कमी होऊ शकतो. म्हणून दिवसभर पुरेसे पाणी पिणे अतिशय महत्त्वाचे आहे. ताण कमी करण्यासाठी जागरूक राहणे खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात रक्तदाब स्थिर ठेवण्यास या सवयी मदत करतात. त्यामुळे नियमित पौष्टीक आहारासह पाणी भरपूर पिणे आवश्यक आहे.

**थंडीत उच्च रक्तदाब असलेल्यांना अधिक धोका**

हिवाळ्यात उच्च रक्तदाबामुळे हृदयाच्या अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. उच्च रक्तदाबामुळे हृदयविकाराचा झटका, किडनीच्या समस्यांचा धोका वाढतो. थंडीत रक्ताभिसरण मंदावल्याने छातीत दुखणे, चक्कर येणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास त्रास होणे, थकवा आणि पायांना सूज येणे, अशी लक्षणे दिसू शकतात. काही लोकांमध्ये रक्तदाब अचानक वाढल्याने दृष्टी अंधुक होऊ शकते, नाकातून रक्त येऊ शकते आणि डोकेदुखीदेखील होऊ शकते. ही सर्व लक्षणे धोक्याची सूचना देतात. त्याकडे दुर्लक्ष करू नये. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी हिवाळ्यात या गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

**पुरेशी झोप घ्या अन् ताण कमी करा**

गरम पाण्याने आंघोळ करा. तुमच्या रक्तदाबाचे नियमितपणे निरीक्षण करा. व्हिटॅमिन डीची कमतरता टाळण्यासाठी सौम्य सूर्यप्रकाशात राहा. पुरेशी झोप घ्या आणि ताण कमी करा.

# १ गाणे, १५० वर्षे आणि असंख्य वाद!

## ' वंदे मातरम् 'चा १५० वर्षांचा इतिहास, प्रत्येक भारतीयाला माहिती असायलाच हवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

' वंदे मातरम् ' हे गीत १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारीला प्रत्येक शाळेत नक्कीच गायिले जाते. पण ' वंदे मातरम् ' हे फक्त एक भावगीत नाही, ते स्वातंत्र्यलढ्याचा आत्मा आहे. या गीताचा इतिहास, त्याची निर्मिती आणि वाद काय आहेत ते जाणून घेऊया.

**संसदेत ' वंदे मातरम् 'वर विशेष चर्चा**

या ऐतिहासिक गीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेत आजपासून विशेष चर्चा सुरू आहे. हिवाळी अधिवेशनातील दहा तास खास या चर्चेसाठी राखून ठेवण्यात आले आहेत. गीताच्या निर्मितीपासून ते आजवरच्या वादांपर्यंत अनेक मुद्द्यांवर संसदेतील दोन्ही सदनांमध्ये चर्चा सुरू आहे. या निमित्ताने जाणून घ्या, वंदे मातरम्बद्दलचे ५ प्रश्न, ज्यांची उत्तरे प्रत्येक भारतीयाला माहिती असायलाच हवीत.

**' वंदे मातरम् ' कोणी लिहिले?**

हे गीत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिले. हे गीत मूळतः संस्कृत आणि



बांगलामिश्रीत भाषेत लिहिले गेले होते. यातील शब्दरचना हाच या गीताचा प्राण मानला जातो.

**हे गीत प्रथम सार्वजनिकरित्या कधी आणि कुठे गायिले गेले?**

' वंदे मातरम् ' प्रथम १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कोलकता अधिवेशनात सादर झाले. हे गीत रवींद्रनाथ टागोर यांनी गायिले होते. त्यानंतर हे गीत देशभरातील स्वातंत्र्यसैनिकांचे प्रेरणास्थान बनले.

**हे गीत प्रथम कोठे छापले गेले?**

१८८२ मध्ये बंकिमचंद्रांच्या ' आनंदमठ ' या कादंबरीत ' वंदे मातरम् ' प्रकाशित झाले. या कादंबरीत ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या संघर्षाचे वर्णन आणि गीताची भूमिका अतिशय प्रभावीपणे मांडली आहे.

**' वंदे मातरम् 'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा कधी मिळाला?**

२४ जानेवारी १९५० रोजी ' जन गण मन 'ला राष्ट्रगीताचा दर्जा देऊन ' वंदे मातरम् 'ला राष्ट्रगीतासमान सन्मान देण्याचा ऐतिहासिक निर्णय याच दिवशी झाला. त्या दिवसापासून हे गीत भारताच्या राष्ट्रभावनेचे प्रतीक बनले.

***स्वातंत्र्यलढ्यात ' वंदे मातरम् ' हे फक्त गीत नव्हते तर ती राष्ट्रीय घोषणा होती. ब्रिटिश सत्तेविरुद्ध एकजुटीचे प्रतीक म्हणून हे गीत गाताना शेकडो क्रांतिकारक तुरुंगात गेले, अनेकांनी प्राणही गमावले.***

**वाद आणि आजची परिस्थिती**

अनेक वर्षांपासून मुस्लीम समाजातील काही गट ' वंदे मातरम् ' हे गीत गाण्याचे टाळतात. त्यांचा या गीताला राष्ट्रगीत म्हणून मान्यता देण्यासही आक्षेप आहे. हा वाद आजही राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी या गीताने १५० वर्षे पूर्ण केली. भारत सरकार तसेच अनेक राज्यांनी या निमित्ताने विशेष कार्यक्रम आयोजित केले आहेत.



# हरभरा पिकावर घाटेअळीचा धोका वाढला

## वेळीच नियंत्रणासाठी कृषी विभागाकडून मार्गदर्शक सूचना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रब्बी हंगामातील पेरण्या आता पूर्णत्वास जात आहेत. त्यात मागील आठवड्यापासून थंडीचे प्रमाण वाढल्याने त्याचा हरभरासह इतर पिकांनाही चांगला फायदा होत आहे. मात्र या काळात हरभरा पिकावर घाटेअळी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे घाटेअळीचे नियंत्रण करण्याचा सल्ला तालुका कृषी अधिकारी ए. एस. खैरनार यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

गेले दोन-तीन दिवस काहीसे ढगाळ वातावरण तयार झाले होते. त्यामुळे या बदलत्या हवामानात कीड, रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची मोठ्या प्रमाणावर शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी आपल्या पिकांचे नियमित सर्वेक्षण करून प्रादुर्भाव तथा आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. सद्यःस्थितीत हरभऱ्यावर घाटेअळीचा प्रादुर्भाव काही ठिकाणी वाढताना दिसत असल्याने तिच्या नियंत्रणासाठी खालील उपाय प्रभावीपणे करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

**काय आहेत उपाय?**

- शेतात इंग्रजी टी आकाराचे प्रतिएकरी २० पक्षी थांबे लावावेत.
- सर्वेक्षणासाठी प्रतिएकरी २ कामगंध सापळे लावावेत.
- हरभरा पीक फुलोराच्या अवस्थेत असताना ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडीरेकटीन ३०० पीपीएम हे ५० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.
- अळी लहान अवस्थेत असताना एच. ए. एन. पी. व्ही. विषाणू ५०० हे १० मि.ली. प्रति १० लीटर पाण्यातून (प्रतिएकर २०० मि.ली.) फवारणी करावी.
- किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास पुढीलपैकी एक कीटकनाशक फवारावे.
- इमामेक्टिन बेंझोएट ५ टक्के
- ४.५ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात (प्रतिएकर ८८ ग्रॅम) क्लोरॅट्रानिलीप्रोल १८.५ टक्के
- ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात (प्रतिएकर ६० मि.ली.)
- फ्लुबेंडामाईड २० टक्के ५ ग्रॅम प्रति १० लीटर पाणी (प्रतिएकर १२५ ग्रॅम) आदींनी रोगनियंत्रण करावे.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# " देवेंद्र फडणवीस एकाच वेळी काय काय करू शकतात हे...",

## एकनाथ शिंदेंची टिप्पणी न् उपस्थितांमध्ये हशा!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात अबोला असल्याची जोरदार चर्चा रंगली होती. काही कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्यानंतरही ते एकमेकांशी संवाद साधत नसल्याचेही चित्र निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी नागपुरात झालेल्या एका प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने एकनाथ शिंदेंनी देवेंद्र फडणवीसांवर उधळलेली स्तुतिसुमने चर्चेचा विषय ठरली. हे प्रकाशन खुद्द देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील भाषणांवर आधारित ' भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल ' या पुस्तकाचे होते. राज्यपालांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तक प्रकाशनावेळी एकनाथ शिंदेंनी केलेल्या ५ विधानांची सध्या जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.

**१) युक्तिवाद करण्यात देवेंद्र फडणवीसांचा हात कुणीही धरू शकत नाही...**

" देवेंद्र फडणवीस स्वतः वकील आहेत. त्यामुळे अचूक युक्तिवाद करण्यात त्यांचा हात कुणीच धरू शकत नाही. अनेक विषयांची माहिती व आकडेवारी त्यांना तोंडपाठ असते. ते विधिमंडळात आक्रमक भाषणेही करतात. ते विरोधी पक्षनेते असतानाही त्यांनी अशी भाषणे केली. समोरून चुकीचे आरोप झाल्यानंतरही त्यांचा आक्रमकपणा आपण पाहिला आहे ," असे एकनाथ शिंदे म्हणाले.

**फडणवीसांसाठी शिंदेंची शायरी!**



**देवेंद्रजी... आपका दिल भी जगहपर दिमाग भी ठिकानेपर दोस्त भी अपनी जगह और दुश्मन भी निशानेपर**

**२) देवेंद्र फडणवीसांचा संयम...**

" देवेंद्र फडणवीस यांच्या उत्तरानंतर सभागृहातील वातावरण बदलून जाते हे सत्ताधारी व विरोधकांनीही पाहिले आहे. विरोधकांचे हल्ले परतवून लावताना आक्रमकता तर हवी, पण संयम असेल तर त्याचा परिणाम अधिक होतो हे देवेंद्र फडणवीसांनी सभागृहात दाखवून दिले आहे, " अशा शब्दांत एकनाथ शिंदेनी फडणवीसांची स्तुती केली.

**३) टोमणे सहन करण्याची फडणवीसांची क्षमता अफाट...**

" देवेंद्र फडणवीसांनी कुणावरही वैयक्तिक टीका केली नाही. हसत-खेळत विरोधकांना चितपट करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. टीका, ट्रोलिंग, टेन्शन, टोमणे सहन करण्याची त्यांची क्षमता अफाट आहे. पण देवेंद्र फडणवीसांनी कधी त्यांना उत्तर दिले नाही, आरडा-ओरड किंवा आदळआपट त्यांनी केली नाही. ज्यांना उत्तर द्यायचे असेल, त्यांना ते बरोबर उत्तर देतात. अंगावर आलेल्या विरोधकांचा ते करेक्ट कार्यक्रमही करतात ," असे कौतुक एकनाथ शिंदेंनी केले.

**४) एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता...**

" एकाच वेळी तुम्ही काय काय करू शकता, हे तुम्ही दाखविलेले आहे. हे काही लोकांना कळले आहे. काही लोकांना कळलेले नाही. अमिताभ बॉलिवूडमधील बिग बी असेल, तर देवेंद्र फडणवीस सभागृहातील बिग डी आहेत. डी म्हणजे वेगळा अर्थ काढू नका. डिव्होशन, डेडिकेशन, डिटर्मिनेशन, डिसिप्लीन आणि डेअरिंगचा हा डी आहे. परिस्थिती कितीही गंभीर असली तरी ते कायम खंबीर असतात. ते कायम थंड डोक्याने परिस्थितीला सामोरे जातात. ते डोक्यावर बर्फाची लादी ठेवतात, " असे शिंदे म्हणाले.

**५) यारों का यार, दुश्मनों का दुश्मन...**

आम्ही २०२२ मध्ये निर्णायक पाऊल उचलायचे ठरविले तेव्हा खंबीर पाठिंबा देणारा त्यांच्यातील एक सच्चा मित्रही मी पाहिला. तेव्हा अनेकदा ते मला हुडी घालून भेटायला यायचे. पण त्यांच्या या हुडीमुळे विरोधकांनी हुडहुडी भरली होती. त्यामुळे त्यांनी यारों का यार, दुश्मनों का दुश्मन हे त्यांनी अनेकदा दाखविले आहे, " अशी आठवण एकनाथ शिंदेंनी यावेळी सांगितली.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची ' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!


जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.



# देवाला कोणत्या महिन्यात कोणते फूल अर्पण करणे लाभकारी?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पद्मपुराणात कोणत्या महिन्यात कोणते फूल देवाला अर्पण करणे लाभकारी असते, हे सांगितले आहे. चैत्र महिन्यात चंपा, चमेली, दौना, कटसरैया आणि वरुण वृक्षाच्या फुलांनी देखील भगवान श्रीविष्णूंची पूजा केली जाऊ शकते. माणसाला एकाग्रतेने लाल किंवा कोणत्याही रंगाच्या कमळाच्या फुलांनी श्रीहरींची पूजा करणे विशेष फलदायी असते. वैशाख महिन्यात केवड्याची पाने घेऊन महाप्रभू विष्णूंची पूजा करावी. ज्येष्ठ महिन्यात त्या ऋतूनुसार मिळणारी फुले किंवा विविध प्रकारची फुले देवाला अर्पण करावीत. जे भाविक असे करतात महाप्रभू विष्णू त्यांच्यावर प्रसन्न आणि समाधानी होतात.

**आषाढ, श्रावण आणि भाद्रपद**

आषाढ महिन्यात कण्हेर, लाल रंगाची फुले किंवा कमळाच्या फुलांनी देवाची पूजा केली पाहिजे. जे लोक या महिन्यात सोनेरी रंगाच्या कदंबाच्या फुलांनी सर्वव्यापी गोविंदाची पूजा करतात त्यांना यमराजाची भीती नसते. तुळशी, श्यामा आणि अशोकाने पूजा



केल्यावर भगवान श्रीविष्णू सर्व त्रास नाहीसे करतात. जे लोक श्रावणात जवस किंवा दुर्वाने श्रीजनार्दनाची पूजा करतात त्यांना देवांकडून प्रलयकाळापर्यंत इच्छित भोगाची प्राप्ती होते. भाद्रपद महिन्यात चंपा, पांढरी फुले, पिवळे आणि लाल रंगाच्या फुलांनी पूजा केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात.

**आश्विन, कार्तिक आणि मार्गशीर्ष**

आश्विन या शुभ महिन्यात जुई, चमेली, कमळ यासह विविध प्रकारच्या शुभ फुलांनी श्रीहरींची पूजा करावी. असे केल्याने माणूस या पृथ्वीवर धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या सगळ्यांना प्राप्त करतो. कार्तिक महिन्यात श्रीहरी विष्णूंची पूजा तीळ आणि त्यावेळी सर्व मिळणारी फुले अर्पण करावीत. मार्गशीर्ष महिना जो भगवान विष्णूंचेच रूप आहे. यामध्ये विविध फुलांनी, नैवेद्याने, धुपाने आणि आरतीने पूजा केल्याने सर्व सांसारिक त्रासातून आराम मिळतो.

**पौष, माघ आणि फाल्गुन**


पौष महिन्यात सर्व प्रकारच्या तुळशीने आणि फुलांनी पूजा करणे फायद्याचे मानले जाते. अशा प्रकारे माघ महिन्यात पिवळ्या रंगाची फुले जसे की मोहरी, झेंडू आणि इतर सर्व रंगांची फुले देवाच्या चरणी अर्पण करावीत. फाल्गुनात देखील पिवळ्या रंगाची फुले आणि नवे फुले किंवा सर्व प्रकारच्या फुलांनी श्रीहरी विष्णूंची पूजा करावी. अशा प्रकारे श्रीजगन्नाथांची पूजा केल्याने माणूस श्रीविष्णूंच्या कृपेने अविनाशी वैकुंठाला प्राप्त होतो.

# मोरया गोसावी : गाणपत्य संप्रदायातील संत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोरया गोसावी महाराज हे १४ व्या शतकातील गाणपत्य संप्रदायातील संत होते. ते मोठे गणेशभक्त होते. त्यांचा जन्म पुण्याजवळील मोरगाव येथे झाला. त्यांनी मोरगाव येथे मयुरेश्वराची आराधना केली. अष्टविनायक यात्रेची सुरूवात करण्याचे श्रेयही त्यांनाच देण्यात येते. ते संत एकनाथ महाराज यांचे समकालीन होते. त्यांनी पुण्यातील चिंचवड येथे संजीवन समाधी घेतली. त्यांचा संजीवन समाधी दिन चिंचवडसह अनेक ठिकाणी बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी साजरा झाला. असे म्हटले जाते की, गणपतीबाप्पांनी मोरयास असा सक्षात्कार करून दिला, की " मी (गणपतीबाप्पा) तुझ्या पूजेकरिता चिंचवड येथे प्रकट होणार आहे. मोरया गोसावी महाराज यांना कऱ्हा नदीपात्रात तांदळा स्वरूपातील गणेशमूर्ती प्राप्त झाली. त्यानंतर मोरया गोसावी महाराज मोरगावहून चिंचवड येथे जाऊन स्थायिक झाले. तेथे त्यांनी गणपती मंदिर उभारले व त्यात कऱ्हेत प्राप्त झालेल्या गणेशमूर्तीची स्थापना केली. काही कळाने मोरया गोसावी महाराजांनी संजीवन समाधी घेतली.

मोरयांना चिंतामणी नावाचा मुलगा होता, तो गणेशावतार होता. चिंचवड येथील मोरया गोसावी महाराजांची समाधी आणि त्यांनी उभारलेले गणेश मंदिर गणेशभक्तांचे प्रमुख आकर्षण आहे.कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात शाली नावाचे गाव आहे. त्यात वामनभट्ट शाळिग्राम आणि पत्नी पार्वतीबाई नांदत होते. देशस्थ ऋग्वेदी, हरितस गोत्राचे वैदिक वामनभट्ट श्रुतिस्मृतिपुराणोक्त गृहस्थाश्रमाचे काटेकोर पालन करत होते. अर्धे अधिक आयुष्य लोटले तरी पुत्रसंतान नाही म्हणून उदास झालेले वामनभट्ट घर सोडून निघाले. पत्नीबरोबर मजल-दरमजल प्रवास करत मोरगावला आले. कऱ्हेच्या पठारावर विराजमान झालेल्या मोरयांना पाहून त्यांचे चित्त विराले. मनोरथ पूर्ण होईल अशी त्यांना आशा वाटू लागली. पोटी पुत्र व्हावा म्हणून त्यांनी खडतर तपश्चर्या केली. शेवटी मोरया प्रसन्न झाले. त्यांच्यापोटी अजन्मा जन्माला आला. पुढे आठव्या वर्षी उपनयन झाले. वेदाध्ययन संपले. मोरयांच्या भेटीसाठी तळमळणाऱ्या मोरयांना योगीराज नयनभारती गोसावी भेटले. त्यांच्या उपदेशाने मोरयांनी मुळा-मुठेच्या काठी थेऊरच्या जंगलात



**मोरया गोसावी :संजीवन समाधी दिन, चिंचवड ...**

चिंतामणी यांची घोर तपश्चर्या केली. बेचाळीस दिवसांच्या कठोर अनुष्ठानाने चिंतामणी प्रसन्न झाले.

' गो ' म्हणजे इंद्रिये, त्यांच्या स्वाधीन झाली. मन मोरयात रमले. शमदम संपन्न गोसावी अष्टसिद्धी प्राप्त करून मोरगावला आले. त्यांच्या सिद्धी गोरगरिबांच्या, दीन-दुबळ्यांच्या संकट निवारणासाठी राबू लागल्या. ' बहुत जनासि आधारू ' झालेल्या त्यांच्या पायाशी येऊन लोक कृतकृत्य होऊ लागले. मोरया गोसावींचा सगळीकडे मोठा बोलबाला झाला. पण यात जनाची उपाधी वाढली. ध्यानधारणेला वेळ मिळेना. एक दिवस अचानक मोरगाव सोडून मोरया गोसावी चिंचवडजवळच्या किव-जाईच्या जंगलात आले. एकांतात ध्यानधारणा करू लागले. पण नियती काही वेगळीच होती. चिंचवडकरांनी त्यांना गावात आणले. आजचा वाडा आहे त्या ठिकाणी त्यांना झोपडी बांधून दिली. त्यात राहून मोरया गोसावी सेवा करू लागले. प्रत्येक महिन्याच्या प्रतिपदेला ते चिंचवड सोडत व मजल-दरमजल करत मोरगावला जात. चतुर्थीला मोरयांची पूजा करत. पंचमीला पारणे करून चिंचवडला परत येत. एकदा कऱ्हेला पूर चढला. पाण्याला जबर ओढ होती. एका कोळ्याच्या पोराचे रूप घेऊन मोरया आले. मोरया गोसावींना त्यांनी कऱ्हेपार केले.

एकदा उशीर झाला. मंदिर बंद करून गुरव घरी गेले. मोरया गोसावींची पूजा अंतरायची पाळी आली. मोरया गोसावी तरटीपाशी बसून मोरयांना आळवू लागले. तर मोरया त्यांच्यासाठी बाहेर आले. एकदा असाच उशीर झाला तर कुलुपे गळून

*मोरया गोसावी यांची संजीवन समाधी त्या काळी मोरया गोसावींचे माहात्म्य खूप वाढले होते. अनेक प्रकारचे लोक दर्शनाला येत. जनसंपर्कामुळे तपश्चर्येत व्यत्यय येत होता. त्यांनी मयूरेश्वराचा धावा केला. त्या क्षणीच मयूरेश्वराने प्रगटून विचारले, की "बोल तुझी काय इच्छा आहे?" मोरया गोसावी म्हणाले, की मयूरेश्वरा, मला आता गुप्तवास करण्याची, समाधी घेण्याची इच्छा आहे. त्यामुळे मला अखंड अद्वैत अवस्था भोगता येईल. " मयूरेश्वर म्हणाले, की "अरे तू आणि मी दोन नाहीत. आपण एकच आहोत. मी अखंड तुझ्या हृदयात निवास करीन. जा, तुझ्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी घडतील..."*

पडली. मोरया गोसाव्यांनी मोरयांची यथासांग पूजा केली. हळूहळू चिंचवडचा पसारा वाढला. अन्नदानाला ते फार महत्त्व देत. अन्नसत्र, सदावर्त, यात्रा, उत्सव, पूजा-अर्चा यामुळे चिंचवड सदाच गजबजू लागले. मंगलमूर्ती मोरयांचा घोष करत, मोरयांचा धर्म वाढवत सन १५६१ मार्गशीर्ष वद्य षष्ठी या दिवशी चिंचवडला पवनेच्या काठी त्यांनी समाधी घेतली. पवनेचा काठ पवित्र झाला. दर्शनासाठी भक्तांची पावले चिंचवड कडे वळू लागली.

## असा आशीर्वाद देऊन मयूरेश्वर अंतर्धान पावले

गेली काही वर्षे मोरया गोसावी देहीच विदेही अवस्था भोगत होते. ते अखंड आत्मानंदात रमलेले असत. समाधानाने व तृप्तीने त्यांनी जीवंत समाधी घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपला विचार आपल्या मुलाला चिंतामणीला सांगितला. त्यांना अतिशय दुःख झाले. वडिलांच्या आज्ञेप्रमाणे पवना नदीकाठावर एक पवित्र भूमी पाहून त्या ठिकाणी समाधीसाठी गुंफा तयार केली. मार्गशीर्ष वद्य षष्ठी शके १४८३, वर्ष १५६१ हा उत्तम दिवस पाहून मोरया गोसावी घरून निघाले. मंदिरात आले. त्यांच्याबरोबर चिंतामणी महाराज, दोन सुना, नातवंडे असा परिवार होता. गावातील अनेक लोक आधीच घाटावर येऊन बसले होते. सगळीकडे मोरया नामाचा गजर चालू होता. मोरया गोसावींनी स्नान केले. पूजा केली. धौतवस्त्र परिधान केले. मोरया गोसावी गुंफेत उतरले. एक-दीड परस खोलीची गुंफा होती. दहा हात लांब, दहा हात रुंद चिरेबंदी पाषाणांनी बांधून काढलेली. मधोमध पाषाणाचा चौरंग, त्यावर आसन, पुढे आणखी एक चौरंग, त्यावर गणेशपुराण, दोन्ही बाजूस दोन समया तेवत होत्या. मोरया गोसावी आसनावर बसले. चिंतामणी महाराजांनी त्यांच्या गळ्यात फुलांचा हार घातला. सुनांनी औक्षण केले. सगळे जण पाया पडत होते. बघता-बघता मोरयांची समाधी लागली. नजर दोन भुवयात स्थिरावली. शरीर ताठ झाले. प्राण ब्रह्मरंध्रात येऊन राहिले. चित्त चैतन्याकार करुन ते आत्मानंदात निमग्न झाले. चिंतामणी बाहेर आले. एक प्रचंड शिळा उचलून त्यांनी गुंफेवर ठेवली. चिंतामणी महाराजांनी समाधीवर सिद्धिबुद्धिसहित मोरयांची मूर्ती बसविली. समाधीकडे जायचा रस्ता होता त्यावर अर्जुनेश्वरांची मोठी शाळुंका स्थापन केली. हे समाधिस्थान जागृत आहे. आजही अनेक भक्तांना साक्षात्कार होतो. प्रचिती



## हवनावेळी स्वाहा का म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा-जेव्हा हवन केले जाते तेव्हा हवनकुंडात स्वाहा म्हणत हवन साहित्य टाकले जाते. स्वाहाचा अर्थ योग्य रीतीने वितरण करणे असा आहे. देवांची आहुती स्वीकारल्याशिवाय कोणताही यज्ञ यशस्वी मानता येत नाही, असे मानले जाते. अग्नीने स्वाहा केले तरच देव अशी आहुती स्वीकारतात.

हवनावेळी स्वाहा असे उच्चारण्याबाबत अनेक प्रकारच्या कथा प्रचलित आहेत, त्यापैकी काही येथे नमूद करत आहोत.

पहिल्या कथेनुसार स्वाहा ही राजा दक्षची कन्या होती, जिचा अग्निदेवाशी विवाह झाला होता. म्हणूनच जेव्हा कोणी अग्नीला काही अर्पण करतो तेव्हा त्याच्यासोबत त्याच्या पत्नीचे स्मरण होते, तेव्हाच अग्निदेव त्या वस्तूचा स्वीकार करतात. दुसऱ्या कथेनुसार एकदा देवांना दुष्काळ पडला... त्यांच्याकडे अन्नपदार्थांचा तुटवडा जाणवू लागला.

ही कठीण परिस्थिती टाळण्यासाठी भगवान ब्रह्मदेवांनी एक उपाय शोधून काढला, की अन्नपदार्थ पृथ्वीवरील ब्राह्मणांनी देवतांपर्यंत पोहोचवावे. त्यासाठी त्यांनी अग्निदेवाची निवड केली. त्यावेळी अग्निदेवाला दहन करण्याची क्षमता नव्हती, म्हणून स्वाहा जन्माला आला. स्वाहाला अग्निदेवाकडे राहण्याचा आदेश दिला. यानंतर जेव्हा -जेव्हा अग्निदेवाला काहीही अर्पण केले जात असे तेव्हा स्वाहा ते जाळून देवांना अर्पण करायचे. तेव्हापासून आजपर्यंत स्वाहा सदैव अग्निदेवांच्या सोबत राहतो.

तिसऱ्या कथेनुसार स्वाहा ही निसर्गाची कला म्हणून जन्माला आली. भगवान श्रीकृष्णांनी स्वाहाला आशीर्वाद दिला होता, की स्वाहाला समर्पित केल्याशिवाय देवतांसाठी अभिप्रेत असलेली कोणतीही सामग्री देवतांपर्यंत पोहोचणार नाही. यामुळेच हवनाच्या वेळी निश्चितपणे स्वाहा पठण केले जाते.ज्योतिषशास्त्रानुसार हवन देवतेने स्वीकारल्याशिवाय कोणताही यज्ञ पूर्ण होत नाही. अग्नीत आहुती देताना स्वाहा म्हटल्यावरच देव हवन साहित्य स्वीकारतात

**(वरील माहिती उपलब्ध स्रोतावरून देण्यात आलेली आहे. याच्या तथ्यांबद्दल आम्ही कुठलाही दावा करीत नाही, तसेच अंधश्रद्धेला दुजोरा देत नाही.)**

## पंढरपूरनजीकच्या गोपाळपूरमधील विष्णूपद

पंढरपूरपासून जवळच असलेल्या गोपाळपूरजवळ चंद्रभागा नदीच्या पात्रात एक पुरातन मंदिर आहे. या मंदिरास विष्णूपद म्हणून ओळखले जाते. यामागे पद्मपुराणात आख्यायिका सांगितली जाते. जेव्हा रुक्मिणी माता देवावर रुसून वनात आल्या तेव्हा देवीच्या शोधात भगवान विठ्ठल ज्या ठिकाणी पंढरपुरात प्रथम आले ते ठिकाण म्हणजे चंद्रभागा नदीच्या पात्रातील मोठा खडक विष्णूपद.

या ठिकाणी एका मोठ्या शिळेवर मध्यभागी देवाचे समचरण आणि देहूडाचरण पाऊले उमटलेली आहेत. त्यासोबत काठी ठेवल्याची खूण आणि काल्याच्या वाडग्याची खूणही आहे. या शिळेवर दगडी मंडप उभारला आहे. येथील खांबावर चतुर्भुज समचरण विष्णुमूर्ती आणि देहूडाचरण मुरलीधराची मूर्ती कोरली आहे. या ठिकाणी विठूरायांनी आपले सवंगडी आणि गायींसह क्रीडा केल्या. येथेच त्या सर्वांनी भोजन केल्याचेही बोलले जाते. तेव्हा या ठिकाणी देवाची आणि गाईची पाऊले उमटल्याची आख्यायिका आहे. भगवान विठ्ठल हे विष्णूंचे अवतार असल्याने येथे उमटलेल्या पावलांमुळे या चंद्रभागेच्या पाण्यातील खडकावरील ठिकाणास विष्णूपद असे नाव मिळाले. मार्गशीर्ष महिन्यात देव या ठिकाणी राहायला येतात, असे मानले जाते. त्यामुळे मार्गशीर्ष महिन्यात या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते. अनेक भाविक नौकानयनाचा आनंद घेत विष्णूपदावर येतात. पंढरपूरकर भाविक डबे घेऊन या ठिकाणी येतात. दर्शन करून नंतर वनभोजनाचा आनंद लुटतात. मार्गशीर्षमध्ये पंढरपुरात वारीला आलेल्या वारकरी दिंड्याही बारस सोडायला या ठिकाणी येतात. मार्गशीर्ष अमावास्येस देव पुन्हा पंढरपुरातील मंदिरात परततात, अशी आख्यायिका आहे. या दिवशी सायंकाळी रथ विष्णूपदावर आणतात. येथे स्थानिक शेतकरी ज्वारीची ताटे वगैरे लावून रथ सुशोभीत करतात. विष्णूपदावर अभिषेक होतो. त्यानंतर दिंडी, वाजंत्रीसह रथ पंढरपुरात येतो.

# ४० करोड़ का चढ़ावा, एक महीने से नोटों की गिनती

## देश के इस मंदिर में भक्तों के दान ने तोड़े सारे रिकॉर्ड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजस्थान के चित्तौड़गढ़ जिले में स्थित प्रसिद्ध श्री सांवलिया सेठ मंदिर के भंडार की इस बार हुई गिनती ने सारे पुराने रिकॉर्ड तोड़ दिए हैं। दीपावली के बाद खोले गए इस दान-भंडार में अब तक ४० करोड़ ३३ लाख ३९ हजार रुपये की नकदी निकल चुकी है, और गिनती अभी भी पूरी नहीं हुई है।

**भंडार दो महीने बाद खोला गया, ५ चरणों में गिनती पूरी, छठा चरण जारी**

मंदिर प्रशासन ने बताया कि इस बार भंडार दो महीने बाद खोला गया था। १९ नवंबर को भोग और आरती के बाद प्रशासनिक अधिकारी प्रभा गौतम, मंदिर मंडल अध्यक्ष हजारी दास वैष्णव और अन्य सदस्यों की मौजूदगी में भंडार खोला गया। फिलहाल ५ चरणों की गिनती पूरी हो चुकी है और छठे चरण में गिनती जारी है। अभी भी नोटों का बड़ा हिस्सा गिना जाना बाकी है, ऐसे में राशि और बढ़ने की पूरी संभावना है।

**२०० से ज्यादा कर्मचारी लगाए गए सत्संग हॉल में हो रही गिनती**

भीड़ और भक्तों की सुविधा को देखते हुए इस बार नोटों की गिनती मंदिर के मुख्य चौक की बजाय सत्संग हॉल में की जा रही है। करीब २०० कर्मचारी लगातार गिनती के काम में लगे हैं। गिनती की प्रक्रिया बेहद सख्त सुरक्षा के बीच की जा रही है। पूरे परिसर में सीसीटीव्ही कैमरे, मैनुअल कैमरे और सुरक्षा कर्मियों की तैनाती है। गिनती स्थल पर मोबाइल और पर्स ले जाना पूरी तरह प्रतिबंधित है।

**नकदी के अलावा सोना-चांदी और विदेशी मुद्रा भी निकलेगी**

अभी तक केवल नकदी की गिनती हुई है। इसके बाद गिना जाएगा कार्यालय में आया चढ़ावा, भेंटकक्ष में जमा दान, ऑनलाइन और मनीऑर्डर से भेजे गए चढ़ावे और सोना, चांदी, सिक्कों और विदेशी मुद्रा की तौल और छंटनी। इनकी गिनती के बाद कुल चढ़ावा और भी अधिक हो सकता है।

**भंडार साल में ११ बार खुलता है**

**हर बार रिकॉर्ड टूटता है**



**कैसे होती है गिनती?**

भंडार से निकली नकदी को बड़े-बड़े बोरों में भरकर सत्संग हॉल लाया जाता है। यहां पहले ५०० रुपये के नोटों की छंटनी कर बंडल बनाए जाते हैं। फिर २०० रुपये के नोटों की गिनती होती है। उसके बाद छोटे नोटों की गिनती होती है। पूरी प्रक्रिया पारदर्शी तरीके से और कड़े सुरक्षा प्रबंधों के साथ की जाती है।

**देशभर से पहुंचते हैं भक्त**

सांवरा सेठ के दरबार में केवल राजस्थान ही नहीं, बल्कि देश के विभिन्न राज्यों से भी भक्त बड़ी संख्या में पहुंचते हैं। श्रद्धालुओं की बढ़ती संख्या को देखते हुए मंदिर प्रशासन हर बार विशेष इंतजाम करता है।